विशेष लेख क्र. २६

१० फाल्गुन १९२८ शके (सायं.५.३० वा.)
गुरुवार दि. १ मार्च, २००७

# युवकांना स्वयंरोजगाराचे साधन म्हणजे गांडुळ खत निर्मिती

***ग्रामीण किंवा शहरीभागात नोक-यांचे प्रश्न फार कठीण झाले आहेत. म्हणून तरुणांनी स्वयंरोजगाराकडे वळले पाहिजे. आज अनेक स्वयंरोजगार उपलब्ध आहेत. ग्रामीण व शहरी भागातील विविध स्वयंरोजगारांची माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य शासनही प्रयत्नशील आहे. अशाच एका स्वयंरोजगाराची माहिती देणारा हा विशेष लेख...***

ग्रामीण विकासात अनेक छोटे-मोठे उद्योग सहभागी असतात. आजचा शेतकरी हा सुशिक्षित व बुध्दिमान आहे. ज्या शेतक-याजवळ ५/६ गुरे आहेत त्याने दुधाबरोबर त्याच्या शेणाचा उपयोग करुन घेतला, तर गांडुळ खतनिर्मितीसारखा एक स्वयंरोजगार घरबसल्या उपलब्ध होऊ शकतो. गांडुळाची अंडीपुंज खतनिर्मितीचा उद्योग हा एक फायद्याचा जोडधंदा आहे. घरच्या घरी गुरांचे शेण उपलब्ध असल्याने फक्त गांडुळे एकदा विकत घेतली म्हणजे अशा प्रकल्पाची पूर्णता होते. आपण रासायनिक खते वापरतो त्याचे पिकांच्यादृष्टीने फायदे आणि तोटेही आहेत. जमिनीचा कस जाऊ नये, म्हणून सेंद्रिय खताचा वापर फार गरजेचा आहे. गांडुळाच्या खतामुळे जमीन सुपिक पोताची होते आणि उत्पादनातही वाढ होत असते. प्रत्येक शेतक-याने गांडुळ खताची निर्मिती करून दुस-या शेतक-यांनाही खत विकावे व जमीनही जिवंत ठेवावी.

गांडुळ खत म्हणजे सेंद्रिय पदार्थ खाल्ल्यानंतर त्यापासून तयार होणारी विष्ठा. ही विष्ठा म्हणजेच गांडुळ खत होय. यामध्ये नत्र, स्फुरद, पालाश, कॅलशियम, संजिवके आणि सूक्ष्मद्रव्य इत्यादींचे सजीव असते. यासाठी बँक कर्जही देते. म्हणून स्वयंरोजगार करु इच्छिणा-या तरुणांनी खादी ग्रामोद्योग मंडळाकडे संपर्क साधावयाचा आहे. त्याबरोबरच जिल्हा कृषी अधिकारी यांचेही मार्गदर्शन घ्यावयाचे आहे.

गांडुळ खतनिर्मितीसाठी गांडुळ वाफ्याचे, बेडचे ऊन आणि पाऊस यापासून संरक्षण करु शकेल अशी मजबूत शेड बांधावी. ३० फूट लांब, १५ फूट रुंद आणि ८ फूट उंचीमध्ये १५ फूट लांब, ३ फूट रुंद आणि २ फूट उंचीचे ४ कुंडे बांधून त्यात शेणखत टाकावे. हे शेड बांबू, वासे, चटई गवताने आच्छादून घ्यावे. उन्हाळयात शेडिंग नेट टाकावी म्हणजे सावली तयार होईल. आयसेनिया फेटीज किंवा युड्रिलस युजिनी या दोन जातीची गांडुळे ४०० प्रती किलो दराने आणावीत. त्याने २४ तासात २ ते ३ पट अन्न खाऊन आपल्या वजनाचे खत दररोज निर्माण होते. ६ महिन्यात गांडुळे दुप्पट होतात. दुस-या वर्षी रोज १०० किलोप्रमाणे ३५ टन खत तयार होईल, यासाठी दररोज गांडुळांना खाद्य, सूर्यप्रकाश, वारा, पाऊस मिळेल याची काळजी घ्यावी. अशा ठिकाणी कोंबडी, उंदीर, घुशी यांचा उपद्रव नसावा. यासाठी सुमारे ७० हजार रुपये खर्च येतो आणि एक लाख रुपये निव्वळ नफा मिळतो.

तरुणांनी नोक-यांच्या मागे न धावता, स्वयंरोजगार करुन आपला विकास साधावा.

**- श्रीपाद नांदेडकर**
वरिष्ठ सहा.संचालक,मंत्रालय